दुरध्वनी क्र.: (०२२) २२८२ ०३११

अपर पोलीस महासंचालक (वाहतुक),
महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय,
मोती महल, ६ वा मजला, १९५, जे. टाटा. मार्ग,
सी. सी. आय. क्लब जवळ, सम्राट रेस्टॉरंट समोर,
चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.

E-mail:
adg.traffic.hsp@mahapolice.gov.in

जा.क्र. अपोमसं (वा.)/४५/मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग/वाहतुक अधिसुचना/ ३८०६ /२०२३, मुंबई दि.:
01 NOV 2023

## "वाहतुक अधिसुचना"

अधिसुचना :-

ज्याअर्थी, मे. प्रोक्टेक सोल्युशन, आय.टी.एम.एस., एल.एल.पी. कंपनीतर्फे यशवंतराव चव्हाण मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर हायवे ट्रॅफिक मनेजमेंट सिस्टीम या प्रकल्पांतर्गत माहे नोव्हेंबर २०२३ ते डिसेंबर २०२३ या कालावधीत कि.मी. ००:००० ते कि.मी. ९४:००० दरम्यान मुंबई ते पुणे व पुणे ते मुंबई या दोनही वाहिनींवर दोन लेग व तीन लेग सर्व्हिसिएबल गॅन्ट्री बसविण्याचे काम सुरू करण्यात आले आहे.

ज्याअर्थी, मे. प्रोक्टेक सोल्युशन, आय.टी.एम.एस., एल.एल.पी. कंपनीतर्फे यशवंतराव चव्हाण मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर कि.मी. ८६:०० मुंबई ते पुणे वाहिनीवर (पुणे कडे जाणारी वाहिनीवर) दिनांक ०२/११/२०२३ रोजी दुपारी १२:०० ते १४:०० या दरम्यान दोन लेग सर्व्हिसिएबल गॅन्ट्री बसविण्याचे काम सुरू करण्याचे नियोजित असल्याने द्रुतगती मार्गावर सर्व प्रकारची वाहने (हलकी तसेच जड-अवजड वाहने) यांची वाहतुक बंद करण्यात येणार आहे. दरम्यान वाहतुक कोंडी होऊ नये, वाहन चालकांची गैरसोय तथा वाहतुक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी रविंद्र कुमार सिंगल, अपर पोलीस महासंचालक (वाहतुक), महाराष्ट्र राज्य, मुंबई याद्वारे शासन अधिसुचना क्र. एम.व्ही.ए. ०५८९/सीआर:१०६१/टीआर-२ दिनांक १९/०५/१९९० Addendum, दिनांक ३०/०९/२००२ नुसार मोटार वाहन कायदा १९८८ चे कलम ११५ अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून यशवंतराव चव्हाण मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर कि.मी. ८६:०० मुंबई ते पुणे वाहिनीवर (पुणे कडे जाणारी वाहिनीवर) दिनांक ०२/११/२०२३ रोजी दुपारी १२:०० ते १४:०० या दरम्यान सर्व प्रकारची वाहनांची (हलकी तसेच जड-अवजड वाहने) वाहतुक पुर्णत: बंद करणेबाबत तसेच जनतेला वाहतुकीसाठी पर्यायी मार्ग वापरणेबाबत अधिसुचना जारी करीत आहे.

१. मुंबई ते पुणे (मुंबईहुन पुणेकडे जाणारी वाहने) वाहिनीवर कि.मी. ५४.४०० वरून एन.एच. ४ जुना मुंबई-पुणे महामार्गावरून वाहतुक वळविण्यात येईल.
२. मुंबई ते पुणे (मुंबईहुन पुणेकडे जाणारी वाहने) हलकी वाहने उर्से टोलनाक्यावरून तळेगाव चाकण लेन ने उर्से खिंड वडगाव फाटा चौक मार्गे एन.एच. ४ जुना मुंबई-पुणे महामार्ग या रस्त्याने पुढे पुणेच्या दिशेला मार्गस्थ करण्यात येतील.

सदरची वाहतुक अधिसुचना वर नमुद कालावधी दरम्यान दोन लेग सर्व्हिसिएबल गॅन्ट्री बसविण्याचे काम पुर्ण होईपर्यंत अमलात राहील.

( डॉ. रविंद्र कुमार सिंगल. )
अपर पोलीस महासंचालक (वाहतुक)
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

C:\Users\Admin\Desktop\Sugar Work\General Letter.....docx

**प्रति -**

पोलीस आयुक्त, पुणे/पिंपरी चिंचवड/नवी मुंबई शहर.
पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण/रायगड.
पोलीस अधीक्षक, महामार्ग पोलीस विभाग, पुणे व रायगड परिक्षेत्र

**प्रत,**

१. परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य
२. मुख्य कार्यकारी अभियंता (मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग), महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, पुणे.